ANNEXURE A


# नवी मुंबई महानगरपालिका

# Navi Mumbai Municipal Corporation

कार्यालय : नमुंमपा मुख्यालय, भूखंड क्र.१,
किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर १५ ए,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४,
दूरध्वनी : ०२२-२७५६ ७०७० / १ / २/ ३/ ४/ ५
फॅक्स : ०२२-२७५७३७८५ / २७५७७०७०

Head Office : Plot No. 1,
Near Kille Gaothan, Palmbeach, Junction
Sector 15A, C.B.D. Belapur, Navi Mumbai- 400 614
Tel : 022 - 2756 7070 / 1/2/3/4/5
Fax : 022 - 27573785 / 27577070


जा. क्र. नमुंमपा./नरवि./बां.प./ 20191CNMMC14862/९९९ /२०१९
दिनांक -१८/०३/२०१९

प्रति,
मे. अरामस रिअल्टी एलएलपी, तर्फे भागीदार श्री. रोहित महादेव पटेल व इतर (३),
भुखंड क्र.२३, सेक्टर क्र. ४०,
नेरुळ, नवी मुंबई.


SEAL OF THE SUB REGIS... DIST.


प्रकरण क्र. 20191CNMMC14862

विषय – भुखंड क्र. २३, सेक्टर क्र. ४०, नेरुळ, नवी मुंबई या जागेत निवासी व वाणिज्य कारणासाठी सुधारित बांधकाम परवानगी देणेबाबत.

संदर्भ - आपला वास्तुविशारद यांचा दि. १५/०२/२०१९ रोजीचा प्राप्त अर्ज.

महोदय,

भुखंड क्र. २३, सेक्टर क्र. ४०, नेरुळ, नवी मुंबई या जागेत निवासी व वाणिज्य कारणासाठी सुधारित बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. संदर्भाधिन जागेत निवासी उपयोगासाठी बांधकाम परवानगी मुंबई प्रांतिक अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ व २५४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४५(१) (३) मधील तरतुदीनुसार सदर पत्रातील १ ते ६ अटी व बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रातील पुर्तता/पालन करणेचे अटीसापेक्ष प्रकरणी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मंजुर करण्यात येत आहे.

पाणी पुरवठा व मलनिःस्सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील.

सार्वजनिक स्वरुपाच्या रस्त्यावर व गटारीत बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा इतर सार्वजनिक जागेवर आढळुन आल्यास आपणावर कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागास कळविण्यात येईल किंवा बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे / सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक / भुखंडधारक / गाळेधारक यांची राहिल. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भुखंड धारकाने कुंपण भिंत बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितांस कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

भूखंड सखल भागामध्ये असल्यास जमीनीची पातळी (Ground Level) भरणी करुन उंच करावी. जमीनीची पातळी ही रस्ता आणि Sewer Line यांच्या पेक्षा उंचावर असली पाहिजे. सांडपाणी, पावसाळ्याचे पाणी आणि मल यांचा निचरा योग्यपणे होऊन भुखंडामध्ये पाणी साचणार नाही अशी भूखंडाची पातळी तयार करावी.

इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करण्यात यावे. बांधकामामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. मंजुर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

इमारतीचे बांधकाम करणारे मजुरांचे निवासीकरीता (Labour Shed) भूखंडाचे हद्दीत आरोग्याच्या दृष्टीकोनातुन त्यांचे तात्पुरते टॉयलेटसह सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूखंडाचे एका बाजुचे सामासिक अंतरात ३.०० मी. रुंदीचे तात्पुरती शेडस् टॉयलेट करण्यास परवानगी देणेत येत आहे. याबाबत पुरेशी व्यवस्था न केल्यास जोता लेव्हलचे पुढील काम करणेस परवानगी देता येणार नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदर शेड स्वखर्चाने काढुन टाकणेत यावी.

कृ.मा.प.




Scanned with CamScanner